ISSN 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

पु.शि.रेगे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा

कविता राजाराम नील

प्रस्तावना:-

कविवर्य पु.शि. रेगे यांचे 'साधना व इतर कविता', 'फुलोरा', 'हिमसेक', 'दोला ', 'गंधरेखा', 'पुष्कळा', 'दुसरा पक्षी', 'स्वानंद बोध' आणि 'प्रियाळ' हे कविता संग्रह आहेत. या काव्यसंग्रहातील कवितेत विविध स्त्रीप्रतिमा आहेत. राधा, अहल्या, शहनाज, मस्तानी या स्त्री प्रतिमा अदिमातेच्या आदिबंधाचाच भाग आहेत. पु.शि. रेगे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा या नवसर्जनाची व सौंदर्याची केंद्रे आहेत. बाला, मुग्धा, प्रेयसी, पत्नी, माता, आदिमाता, स्त्रीच्या या विविध रुपांचा वेध घेत उर्वशी, अहल्या, राधा, मस्तानी इत्यादीस्त्रीप्रतिमांतून रेगे प्रतिकात्मक नवा अर्थ सूचित करतात. विविध प्रतिमेतून रेगेस्त्रीशक्तीची समग्रता दर्शवितात. या स्त्रीप्रतिमा रेगे यांच्या कवितेची प्रेरणा आहेत. एका शक्ती केंद्राची अनुभूती ते या विविध स्त्रीप्रतिमातून घेत राहतात. पु. शि. रेगे यांच्या कवितेतील पुरुषमनाला स्त्रीमनाची सनातन ओढ आहे.स्त्रीचे शरीरलावण्य, तिची संवेदनमयता, अवाहकता, कारुण्य, मादकता या विविध भावरुपांना रेगे आपल्या कवितेतून शब्दबध्द करतात. रेगेस्त्रीला अनैतिक दृष्टीकोनातून पाहत नाहीततसेच आदर्शवादी दृष्टीकोनातूनही पाहत नाहीत; स्त्रीकडेत्यांची पाहण्याची दृष्टी न- नैतिक, निकोप आहे.

कवितेत प्रतिमेला महत्वाचे स्थान असते. कवितेचे स्वरुप म्हणजे अनेक प्रतिमांनीतयार झालेली एक प्रतिमाच असते, असेही म्हटले जाते. प्रतिमासृष्टीहा कवितेचा आत्मा आहे. प्रतिमा म्हणजे मानवी मनाच्या पटलावर प्रकटलेली इंद्रियसंवेद्य प्रतिकृती, काव्यातल्या प्रतिमा शब्दांनी निर्माण केलेल्या असतात, तशाच अनुभवजन्य ही असतात. त्यांना मानसिक प्रतिमा संबोधता येईल. रुपकात्मक किंवा उपमादर्शी अशाही अलंकारीक प्रतिमा असतात. अंतिमत: मानसिक, अलंकारीक आणि प्रतिकात्मक अशा तीन प्रकारच्या भिन्न प्रतिमा राहत नसून त्या परस्परात मिसळून जातात. डॉ. सुधीर रसाळ 'कविता आणि प्रतिमा' या पुस्तकातम्हणतात, कवितेत आपणास अनेकदा दोन वस्तुंची किंवा घटनांची साधर्म्य वैधर्म्याची दृष्टीनेतुलना केलेली आढळते किंवा दोन वस्तूंमध्ये किंवा घटनांमध्ये एकात्मता जाणवून दिली जाते. उपमारुपकादी अलंकार म्हणूनओळखला जाणारा जो काव्यघटक आहे त्यालाच 'प्रतिमा' या संज्ञेने संबोधणारा समीक्षकांचा एक वर्ग आहे.याचाच अर्थ प्रतिमा म्हणजे रुपक वा उपमा अलंकाराचेच दुसरे रुप होय. "प्रतिमा हा प्रतिबिंब या अर्थाचा शब्द आहे".ललितकला आणि मानसशास्त्रामध्ये या शब्दाचे प्रचलन विशेषकरुन आहे. दृश्यवस्तूमुळे घडणाऱ्या वेदनांच्या उद्दीपनाशिवाय केवळ कल्पानाशक्तीमुळे त्या त्या वस्तूची प्रतिकृती किंवा प्रतिबिंब जेव्हा मनात साकारहोते, त्या प्रतिबिंबास प्रतिमा म्हणतात; अशी मराठी विश्वकोशात प्रतिमेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रतिमांना पूर्वानुभवाचा आधार असतो.त्या केवळ शून्यातून निर्माण होत नाहीत. इंद्रियगम्य दृक, श्रुती, गंध, रुची व स्पर्श या संवेदनांशी प्रतिमांचा संबंध असतो. या संवेदनांचा अनुभव आपण आपल्या नेहमीच्या जीवनातून घेत असतो, मात्र केवळ इंदियसंवेदनांचे सलग चित्र जागृत करणाऱ्या शब्दसमूहास आपण प्रतिमा म्हणत नाही, तर या संवेदनाशी संलग्न असलेल्या भावना व जाणिवांचेही त्यात प्रक्षेपणहोत असते. या दृष्टीने गो.वि. करंदीकर इंद्रिय संवेदनाचे गोचरत्व व भारलेली जाणीव याला प्राधान्य देत कल्पनेच्या इंद्रियगोचर पातळीला मानसिक संदर्भाशी निगडित करीत, "कल्पनेच्या पातळीवर इंद्रियगोचरहोऊ शकणारा व जाणिवेने भारलेला कवितेचा प्राथमिक घटक म्हणजे प्रतिमा होय". अशी व्याख्या करतात.

प्रतिमेला कवितेच्या संदर्भात अधिक महत्व आहे. शब्द, ओळी, कडवी, ध्रुवपद, समांतरता, लय, ताल, छंद, प्रतिमा, प्रतिक, रुपक, मिथक, आदिबंध इत्यादी घटकांचीसंघटना म्हणजे कविता होय. त्यामुळे कवितेपासून प्रतिमा मुक्त करता येत नाही.

राधा, अहल्या, उर्वशी, मस्तानी या स्त्री प्रतिमांतून रेगेस्त्रीशक्ती समग्रता आणि आदिमातेचा आदिबंध निर्देशित करतातच, या शिवाय 'पुष्काळा' या कवितेत स्त्री अनुभवाचे तीन घटक आहेत.पहिल्या कडव्यात स्त्रीच्या अर्थातच प्रियेच्या अंगमनाचे वर्णन आहे.दुसऱ्या कडव्यात तिच्याकडून मिळणारा प्रत्यक्ष शरीरानुभव आहे, तर तिसऱ्या कडव्यात तिचे घडलेले नवदर्शन आहे.'पुष्काळाचतू पुष्काळवंती/पुष्कळ पुष्कळ पुष्काळणारी' 'पुष्कळ' हे विशेषण वापरुन रेगे प्रियेचेअंग, मन, रतिक्रिडा

या भावानुभवाचा प्रत्यय घेतात.'रेषा' या कवितेतून रेगे यांनी लेण्यातील एक शिल्पित स्त्रीप्रतिमा अविष्कृत केली आहे.तिचे अंगसौष्ठव तिच्याच अंगरेषांतून मूर्त केले आहे.

पु.शि. रेगे यांनी 'राधा' या स्त्री प्रतिमेचे प्रेमभावाच्या व शृंगाराच्या अंगाने उत्कट चित्रण केले आहे. 'त्रिधा राधा' या कवितेत राधेची मलिनपूर्व मनःस्थिती, कृष्णात रुपलेली राधा, कृष्णापासूनतृप्तमनाने दूर झालेली राधा, तरीही त्याच्या भोवती असणारी 'विप्रश्न' राधा आहे. राधेची कृष्णाविषयी वाटणारी ओढ इतकी उत्कट आहे की, जणूती 'युगायुगिची' वाटावी 'गोविंदात' साळीच्या क्षेत्रा' सारखी रुजलेली राधाही आपली शक्ती व सौंदर्य घेऊन आत्मसर्पणाला उत्सुक झालेली आहे. "आकाश निळेतोहरि । अन् एक चांदणी राधा । बावरी युगानयुगिची मन-बाधा । विस्तीर्ण भुई गोविंद । अन् क्षेत्रसाळिचे राधा".राधा आणि कृष्ण याचे प्रेमसंबंध हे आदिम आहेत.पु.शि. रेगे यांच्या राधेत आदिमातेचा आदिबंध आहे.'राधा' ही आदिप्रतिमासर्जक, प्रेरक व अश्वासक आहे.

'अहल्या' या स्त्री प्रतिमेला पु.शि. रेगे यांनी नवा अर्थ दिला आहे.गौतमऋषीची पत्नी असलेल्या अहल्याकडे इंद्र गौतमऋषीच्या रुपात येवून तिचा संभोग घेतो.पारंपारिक दृष्टीकोनातून नीतिमत्तेच्या निकषांतूनहा व्याभिचार होता.गौतमऋषीने दोघांनाही शाप दिला.अहल्याने शिळारुपात शाप भोगला. पारंपारिक नीतिकल्पनेहून पूर्णपणे विपरीत नीतिकल्पना सूचित करणारा नवा मिथकीय अर्थ, रेगे यांनी व्यक्त केला की, इंद्राने केलेल्या फसवणुकीतूनही अहलेल्या वाट्याला एक विलक्षण उत्कट संभोग आला. समागामाच्या असोशीचा अनुभव तिला शिळावस्थेतही तृप्त करुन जातो.अहलेचा अजाणता इंद्राशी झालेल्या समागमाकडे कवी नव्या दृष्टीने पाहतो.'अहल्या' हीस्त्रीप्रतिमा पारंपारिक दृष्टीकोनातून शब्दबध्द न करता नव्या दृष्टीकोनातून शब्दबध्द केली आहे.

पु. शि. रेगे यांची 'शहनाज' ही एकूण अठरा भागांच्या प्रदीर्घ मुक्तछंदात्मक रचनेतूनसाकारहोणारी, उर्दू नावातील रोमांन्टिक छटा धारण करणारी आणि विभ्रमांची राणीहा अर्थ अभिप्रेत असलेली कविता एक नवी स्त्रीप्रतिमा निर्माण करते. मनस्विनी, दक्षायणी, तापसी, उमा, गायत्री, सीता, राधा, पांचाली अशा विविध स्त्रीरुपातून स्त्रीचे समग्रत्व दिसून येते.'शहनाज' म्हणते- "मी आहेतीच पुरातन आर्या । पहा ना । तुमच्यासाठीहोऊन राहिले आहे मनस्विनी दक्षायणी । तापसी उमा । गायत्रीसीता । स्वरविध्दा राधा। जघनघना पाचांली".

'चेटकीनतू' या कवितेत पु.शि. रेगे यांनी प्रियकर आणि पुत्र अशा दोन्ही भूमिकांतून माणूसस्त्रीला कसा शोधतो, आयुष्यभर तो स्त्रीत्तत्वाचा शोध घेत असतो असा आशय व्यक्त केला आहे. 'त्रिधा राधा', 'बुंधी', 'संग', 'भान', 'चापेयाची पिवळी पवळण', 'राधा' अशा अनेक कवितांमधून राधेची आदिप्रतिमा शृंगार, प्रेम, सर्जन, करुणा, आनंद, उत्कट भक्ती या भावनांचा आविष्कार करते. 'द्वारिकेतं राधिका' या कवितेत 'राधेच्या स्त्रीप्रतिमेचे रुप अनोखा भावानुभव व्यक्त करते.कवी राधाशिवाय कृष्णाची कल्पना करुच शकत नाही.राधाकृष्णाच्या प्रेमातील अद्वैत राधेच्या प्रतिमेतून व्यक्त होते.

माणसाचा स्त्रीविषयक पहिला अनुभव हा मातृस्पर्शाचा, मायेचा असतो.तिच्या स्तनपानातूनतीचत्याचीसर्जिका, पोषिता, रक्षिता, संगोपिका, देवता असते.तिचा आधार व मनसिक पातळीवर अनुभवलेली तिची दैवीशक्ती यामुळे व्यक्तिगत अनुभवनातील मातेची प्रतिमा आणि मानवाच्या सामुहिक अबोधातील आदिमातेची प्रतिमा दोन्ही एकरुप होतात.त्याला अश्वासक आधार व प्रेरणा देतात.पु.शि. रेगे यांच्या कवितांतून दिसणाऱ्या स्त्रीप्रतिमा या आदिमातेच्या आदिबंधाचाच भाग आहेत.

निष्कर्ष:-

१. पु. शि. रेगे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा या नवसर्जनाची व सौंदर्याची केंद्रे आहेत.
२. विविध स्त्रीप्रतिमांतून रेगेस्त्रीशक्तीची समग्रता दर्शवितात.
३. रेगेस्त्रीकडे अनैतिक दृष्टीकोनातून पाहत नाहीततसेच आदर्शवादी दृष्टीकोनातूनही पाहत नाहीत. स्त्रीकडेत्यांची पाहण्याची दृष्टीही न-नैतिक आणि निकोप आहे.
४. पु. शि. रेगे यांच्या 'राधा' या स्त्रीप्रतिमेत आदिमातेचा आदिबंध आहे. 'राधा' ही आदिप्रतिमासर्जक, प्रेरक व अश्वासक आहे.
५. पु. शि. रेगे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमाहीसर्जिका, पोषिता, रक्षिता, सगोंपिका, देवता, आदिमाता या विविध भूमिकांतून आविष्कृत होते.
६. रेगे यांच्या कवितेतील स्त्रीप्रतिमा या आदिमातेच्या आदिबंध आहेत.

संदर्भ:-

१. डॉ. सुधीर रसाळ- 'कविता आणि प्रतिमा' पृ. २०० व २००१
२. संज्ञा संकल्पना कोश. पृ. १६५
३. मराठी विश्वकोश, १०, संपा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, म. रा. सा. सं. मंडळ १९८१ पृ. ३०८
४. करंदिकर गो. वि. - 'परंपरा आणि नवता' पॉप्युलर प्रकाशन १९८०, पृ. १०९
५. 'सुहृदयगाथा'- संपा. गंगाधर पाटील
६. डॉ. प्रा. केशव सद्रे 'कवितेतील आधुनिकवाद' शब्दालय प्रकाशन
७. 'फुलोरा'/'हिमसेक'/'त्रियाळ'/'गंधरेखा'/- पु. शि. रेगे.